**पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ३३
**दुरध्वनी क्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी - dcphq.pcpc-mh@gov.in

**दिनांक - २३/१०/२०२३**

# प्रेसनोट

**खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी**

## फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवुन, खंडणी मागणा-या जीम ट्रेनला अटक

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात छोटे-मोठे व्यावसायीक, कंपनी तसेच जनतेकडून कोणत्याही प्रकारे जबदस्तीकरुन, त्यांचेकडून हप्ता वसुली करुन, खंडणी गोळा करणाऱ्या इसमाबाबतची माहिती निर्भिडपणे देण्याकरीता पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात पोलीस स्टेशन व खंडणी विरोधी पथकामार्फत दर्शनीय भागावर फ्लेक्स लावुन, नागरीकांना निर्भीडपणे तक्रार द्यावी याबाबत जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

एका कॉलेज विद्यार्थ्याने खंडणी विरोधी पथकाकडे येवुन, कळविले की, त्याचा हरविलेला पेनड्राईव्हमधील फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवुन, त्याचेकडे ०५ लाख रुपयांची खंडणी मागणी करुन, पैसे दिले नाहीतर मारुन टाकण्याची धमकी एका अनोळखी मोबाईल नंबरव्दारे अज्ञात इसमाने दिल्याचे सांगितले. त्यानुसार वेळोवेळी भिती घालून त्याचेकडून वेगवेगळ्या मार्गाने, १४,०००/- रु घेतलेले आहेत. व अजुनही पैशाची मागणी करत असल्याचे सांगितले. सदर तक्रारीचे गांभीर्य पाहून सदर माहिति खंडणी विरोधी पथकाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री अरविंद पवार यांनी मा.पोलीस आयुक्तांना दिली असता, त्यांनी तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानुसार तक्रारदार यांचा जबाब नोंद करुन, तात्काळ चाकण पोलीस ठाणे गुरनं. ८५७/२०२३ भादवि कलम ३८४,३८६,३८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**फिर्यादीस खंडणी मांगणाऱ्या मोबाईल नंबरचे व त्याने पाठविलेल्या क्युआर कोडचे तांत्रिक विश्लेषण करुन, आरोपी नामे मिथुन सोपान मुंगसे वय-३६ वर्षे रा. सध्या चक्रेश्वर मदीर रोड, चाकण, पुणे मुळगाव मुपो. रासे, ता.खेड, जि. पुणे यास सापळा लावुन ताब्यात घेतले. त्याचेकडे चौकशी करता, तो फिर्यादी ज्या जीममध्ये व्यायामासाठी जातो. तेथे जीममध्ये ट्रेनर आहे. जीममध्ये फिर्यादी व त्याचे मित्रांमध्ये झालेल्या चर्चेतून, फिर्यादीचा पेनड्राईव्ह हरवलेला असुन, त्यात फिर्यादीचे पर्सनल फोटो व व्हिडीओ असल्याचे समजले. त्यातुनच त्याने फिर्यादीस ब्लॅकमेल करुन, पैसे उकळण्याचा प्लॅन केला असल्याचे सांगितले.**

**सदरचा खंडणीचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणुन, आरोपीस त्याने गुन्हयात वापरलेल्या मोबाईल फोनसह पुढील कारवाई कामी चाकण पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.** सदर गुन्हयाचा पुढील तपास चाकण पोलीस स्टेशन करीत आहे.

**सर्व नागरिकांना अवाहन करण्यात येते की, त्यांचेकडे कोणत्याही प्रकारे खंडणीची मागणी होत असल्यास, त्यांनी खंडणी विरोधी पथकास मोबाईल क्रमांक 7517751793 तसेच ईमेल आयडी piaec.pcpc-mh@mahapolice.gov.in व indgrevcell-pcpc@mah.gov.in यावर संपर्क साधावा.**

सदरची कारवाई मा.विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.डॉ.संजय शिंदे पोलीस सह आयुक्त, मा.वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.सतिश माने, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे, पोलीस अंमलदार किरण काटकर, प्रदीप गोडांबे, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, सुधीर डोळस व नागेश माळी** (तांत्रिक विश्लेषण विभाग) यांचे पथकाने केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे, पिंपरी चिंचवड**